# एफ.सी.आर.ए. (FCRA) परवाने/लाइसेंस रद्द झाल्यावर कुणाचे सर्वात जास्त नुकसान होईल?

रजिका सेठ, स्मरिनीता शेट्टी

*भारतातील सामाजिक सेवा संस्था सातत्याने त्यांचे एफ.सी.आर.ए. (FCRA) परवाने गमावत आहेत, याचा परिणाम त्यांच्या कार्यकर्त्यांवर, ते सेवा देत असलेल्या लोकांवर आणि एकुणच समाजावर होत आहे.*

२०२३च्या पहिल्या सहा महिन्यांत जेव्हा ७० भारतीय स्टार्टप कंपन्यांनी १७,००० कर्मचाऱ्यांना (एडटेक फर्म बायजूच्या २,५०० लोकांसह) कामावरून काढून टाकले, तेव्हा कंपन्या, त्यांचे कर्मचारी, स्टार्ट-अप इकोसिस्टम आणि अर्थव्यवस्थेसाठी या सर्वाचा काय अर्थ आहे हे समजून घेण्यासाठी बरीच न्यूजप्रिंट आणि डिजिटल शाई समर्पित करण्यात आली.

सात महिन्यांच्या कालावधीत FCRA गमावलेल्या १०० पेक्षा जास्त संस्थांशी याची तुलना करता असे लक्षात येते की Byju's मधील २,५०० लोकांच्या तुलनेत CARE (भारतात कार्यरत असलेल्या मोठ्या जागतिक सामाजिक सेवा संस्थांपैकी एक) मधील अंदाजे ४,००० लोकांनी आपले रोजगार गमविले आहे.

आणि तरीही, अर्थव्यवस्थेसाठी याचा अर्थ काय आहे यावर कुठल्याही प्रकारची चर्चा नाही. सामाजिक सेवा संस्थांचे देशाच्या जीडीपी (GDP) मध्ये २ टक्क्यांचे योगदान आहे ; अशा परिस्थितीत संस्थांच्या व्यवहार्यतेवर; त्यांच्या कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या दुर्बल परिणामावर (ज्यापैकी बहुतेक लहान शहरात आणि खेड्यांत कार्यरत आहेत); आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, लाखो असुरक्षित कुटुंबांवर जे या संस्थांमार्फत प्रदान केल्या जाणाऱ्या अत्यावश्यक सेवा सुविधांपासून वंचितराहणार आहेत या सर्व विषयांवर चर्चा होणे गरजेचे नाही का?

## अदृश्य क्षेत्र

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या (MoSPI) २०१२ च्या अहवालानुसार, नागरी सामजिक संस्थ्यांमध्ये (CSOs) २७ लाख नोकऱ्या आणि ३४ लाख पूर्णवेळ स्वयंसेवक आहेत, जे सार्वजनिक (public) क्षेत्रापेक्षा जास्त रोजगाराचे आकडे दर्शवित आहेत. CSO Coalition@75 द्वारा आयोजित आणि GuideStar India द्वारा अँकर (anchor) केलेल्या ५१५ सामाजिक सेवा संस्थांच्या सर्वेक्षणात, ४७ टक्के लोकांनी नोंदवले आहे की ते काम करत असलेल्या अर्ध्याहून अधिक स्थानिक भौगोलिक क्षेत्रांमध्ये औपचारिक रोजगाराचे सर्वात मोठे स्त्रोत सामाजिक सेवा संस्था आहेत.

शिवाय, सामाजिक सेवा संस्था राज्य आणि जनतेला जोडणारे/रा कनेक्टर/दुवा आहेत. ५० टक्क्यांहून अधिक संस्था स्थानिक पातळीवर, ग्रामीण भागात आणि महत्वाकांक्षी जिल्ह्यां मध्ये (aspirational districts) काम करतात. या संस्था शिक्षण, आरोग्य आणि पोषण, आजीविका, पाणी आणि स्वच्छता, हवामानातील बदल, शेती, महिला आणि बाल हक्क, अपंगत्व आणि नागरिकांच्या सहभागावर काम करतात - नागरिकांच्या जीवनातील प्रत्येक पैलू समाविष्ट करतात. ते स्थानिक उपजीविका तयार करतात, कौशल्ये विकसित करतात, सामाजिक गतिशीलतेला प्रोत्साहन देतात आणि स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देतात. सर्वेक्षण करण्यात आलेल्या संस्थांपैकी निम्म्या (५०%) सरकारी संस्था (शाळा, पंचायती, नगरपालिका, अंगणवाड्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे) आणि स्वयं-सहायता गटांसोबत (SHGs) काम करतात. त्यांचे बळकटीकरण खरे तर स्थानिक क्षेत्राच्या विकासालाच गती देते.

सामाजिक सेवा संस्थांमधील नोकऱ्या या खाजगी आणि सरकारी क्षेत्रातील नोकऱ्यांसारख्या नाहीत. अश्याच एका संस्थेच्या प्रमुखाने म्हटल्याप्रमाणे, सामाजिक संस्थेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भूमिका सामाजिक बदल घडवून आणणे आहे; ही फक्त एक नोकरी नाही. “जेव्हा अशा नोकऱ्या गमावल्या जातात, तेव्हा वंचित आणि असुरक्षित समुदायाला जीवन घडविण्याच्या संध्या देखील कमी होत जातात”

## समुदायांवर होणारा परिणाम तात्काळ आणि लक्षणीय असतो

FCRA रद्द केल्यामुळे विविध प्रकारची कामे ठप्प झाली आहेत. बाल संरक्षण, लसीकरण, नवजात मृत्यू रोखणे, शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये आरोग्य आणि पोषण सुविधांची तरतूद, बालपणीच्या सुरुवातीच्या शिक्षणासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी साहित्य तयार करणे, पालकांना त्यांच्या मुलांच्या शालेय शिक्षणात सहभागी करून घेणे, तरुणांना कौशल्य आणि उपजीविकेची संधी उपलब्ध करून देणे, सरकारी सेवा-सुविधां/हक्कां(एंटाइटलमेंट)पर्यंत सर्व-सामन्यांची पोहच सक्षम करण्यासाठीचे प्रयत्न करणे - हे सर्व त्या भागात थांबले आहे जेथे या सामाजिक सेवा संस्था कार्यरत होत्या. संस्थांचे FCRA परवाने रद्द झाल्यामुळे प्रति संस्थेत अंदाजे ४,००० ते ८ लाख लोक यापुढे या सामाजिक सेवा संस्थांद्वारे प्रदान केलेल्या सेवां-सुविधां पासून वंचित होणार आहेत.

## सक्षमकर्ता म्हणून सामाजिक सेवा संस्थांवरील विश्वास डळमळीत झाला आहे

सेवा बंद होण्यापलीकडे, विश्वासाच्या प्रणालीचे विघटन होते(जो विश्वास स्थापन करण्यासाठी सामाजिक सेवा संस्थांमधील आघाडीच्या कार्यकर्त्यांनी समुदायासोबत अनेक वर्षे काम केले आहे ); सक्षमकर्ता म्हणून सामाजिक सेवा संस्थांवरील विश्वास डळमळीत होतो.

एका मोठ्या सामाजिक सेवा संस्थेच्या CEOच्या मते, “फक्त संस्थेचे काम थांबले आहे असे नाही; लोकांना आमच्यामुळे निराशा वाटते. भविष्यात जेव्हा आम्ही म्हणू की आम्ही विशिष्ट कालावधीत एक विशिष्ट वचनबद्धता पूर्ण करू तेव्हा ते आमच्यावर विश्वास का ठेवतील?” हा गमावलेला विश्वास परत आणणे कठीण आहे.

**अदृश्य कार्यशक्ती**

एका बाजूला समाज असहाय्य तर होतोच, पण याचबरोबर अग्रभागी कामगार/फ्रंट लाइन वर्कर (जे लोक या सामाजिक सेवा संस्थांचे कार्यकर्ते आहेत) आणि त्यांच्या कुटुंबांवरही गंभीर परिणाम होतो.

अनेक आघाडीचे कार्यकर्ते ज्यांनी आपली नोकरी गमावली आहे ते सामान्यत: पदवीधर (graduates) आहेत किंवा काही प्रकरणांमध्ये, पदव्युत्तर पदवीधर (post-graduates)आहेत. ते त्याच समुदयात रुतलेले आहेत आणि त्यांच्यापैकी बहुतेकांनी त्या गावात किंवा शहरात राहणे पसंत केले आहे. त्यांची उपजीविका आणि सामर्थ्य स्थानिक परिसंस्थे(लोकल एकोसिस्टम) भोवती विकसित झाली आहे. वर नमूद केलेल्या संस्थाप्रमुखानुसार, या व्यक्ती तेथे फर्स्ट-माईल कनेक्टर आणि इंटिग्रेटर (first mile connectors and integrators) आहेत; ते समाजात खोलवर रुजलेले आहेत आणि समाजासाठी ते मौल्यवान आहेत. "याचा अर्थ असा आहे की या फील्ड कार्यकर्त्यांना तेथे ठेवण्यासाठी सामाजिक सेवा संस्था आवश्यक आहेत आणि आम्ही समुदायांसोबत करत असलेल्या कामासाठी आम्हाला या कार्यकर्त्यांचीगरज आहे," असे ते म्हणतात.

त्यांच्या प्रमाणे ज्या भागात ग्रामीण समाजसेवक राहतात तेथे रोजगाराच्या मर्यादित संधी असतात. “उद्योग आणि इतर उपजीविकेच्या संधींसारख्या विकासाची फळे या क्षेत्रांपर्यंत पोहोचली असती, तर या व्यक्तींना रोजगाराचे अनेक पर्याय उपलब्ध झाले असते. आम्ही गेल्या काही वर्षांत जे पाहिले ते असे आहे की विकास कार्य (डेवलपमेंट वर्क)हा बहुतेक लोकांसाठी शेवटच्या पर्यायांपैकी एक आहे - ते सरकारी नोकरी किंवा काही खाजगी उद्योगाला प्राधान्य देतात कारण तेथे चांगली भरपाई, सातत्य आणि उत्पन्नाची निश्चितता आहे. FCRA रद्द केल्याने आणि अचानक नोकऱ्या गमावल्याने सामाजिक क्षेत्रात काम करण्याच्या अनिश्चिततेबद्दलची धारणा दृढ झाली आहे.

**कमी नोकऱ्या आणि जास्त कामगार/नोकऱ्यांचा/रोजगाराचा अभाव**

सीमा मुस्कान या ३५ वर्षांच्या, पटना येथील संशोधक असून त्या एका सामाजिक सेवा संस्थेत काम करायच्या. त्यांना आरोग्य, शिक्षण आणि पोषण या क्षेत्रात १५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. मार्च २०२३ मध्ये

त्या काम करत असलेल्या सामाजिक सेवा संस्थेने त्यांचा FCRA परवाना गमावला. त्यामुळे सीमाने त्यांची नोकरी गमावली आणि त्यासोबतच त्यांची ओळख आणि आर्थिक स्वातंत्र्याची भावनाही गमावली.

सीमा यांच्या मते, दुसरी नोकरी शोधणे सोपे नाही. "प्रत्येकाचा FCRA धोक्यात आहे. इतर सर्व सामाजिक सेवा संस्थांमध्ये असा विश्वास आहे की ते त्यांचे FCRA परवाने गमावण्याच्या पंक्तीत आहेत. भीती इतकी घट्ट आहे की ते नवीन लोकांना कामावर घेत नाहीत."

सीमा म्हणतात की छत्तीसगड आणि झारखंडसारख्या राज्यांमध्ये इतर मोठ्या सामाजिक सेवा संस्थांसोबत काही संधी आहेत. पण त्यांच्या कुटुंबामुळे त्यांचे पटना मध्ये राहणे गरजेचे आहे; त्यांचा नवरा, मुले आणि सासरे तिथे आहेत. "मला पाच आणि आठ वर्षांची दोन लहान मुलं आहेत. मी त्यांना सोडून दुसऱ्या गावात किंवा शहरात काम करायला जाऊ शकत नाही."

### सर्वेक्षण केलेल्या ६४ टक्के सामाजिक सेवा संस्थांनी सांगितले की त्यांचे कर्मचारी त्यांच्या कुटुंबातील एकमेव कमावते आहेत

"जेव्हा तुमची नोकरी असते, तुमची समाजात एक ओळख असते, तुम्ही स्वावलंबी असता, तुमचा स्वतःचा पैसा असतो आणि तुम्ही तुमच्या मुलांच्या शिक्षणात हातभार लावता," असे सीमा यांचे म्हणने आहे. सीमा यांनी त्यांच्या मोठ्या गृहकर्जाची परतफेड तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी हातभार लावला. आता त्यांना भीती वाटते की हा उत्पन्नाचा अभाव त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिरता प्रभावित करेल. "तुम्ही तुमचे खर्च लक्षणीयरीत्या कमी करू शकता, तुम्ही अनेक गोष्टी कमी करू शकता, पण एक गोष्ट तुम्ही कमी करू शकत नाही ती म्हणजे तुमच्या मुलांचे शिक्षण व त्याचे खर्च. पण आता मात्र ही शक्यता दिसत आहे," असे त्यांना वाटते.

सीमा यांना मात्र विश्वास आहे की त्यांचे पुरुष सहकारी अधिक प्रभावित झाले आहेत. "माझ्याकडे नोकरी नसली, तरी माझ्या पतीच्या व्यवसायामुळे थोडेफार पैसे तरी घरात येत आहेत. माझ्या अनेक सहकाऱ्यांसाठी, हे खूपच वाईट आहे कारण ते प्राथमिक कमावणारे आहेत; त्यांचे कुटुंब त्यांच्यावर अवलंबून आहे."

GuideStar India च्या सर्वेक्षणानुसार, सर्वेक्षण केलेल्या ६४ टक्के सामाजिक सेवा संस्थांनी सांगितले की त्यांचे कार्यकर्ते त्यांच्या संबंधित कुटुंबातील एकमेव कमावते आहेत.

दिनेश कुमार यांची संपूर्ण कारकीर्द सामाजिक क्षेत्रात गेली आहे. शिक्षण, बाल संरक्षण, पोषण आणि पंचायती राज संस्थांमध्ये त्यांना १८ वर्षांचा अनुभव आहे. ते पूर्वी काम करत असलेल्या सामाजिक सेवा

संस्थेमध्ये, त्यांच्या कामामुळे वंचित समुदायातील लोकांना ४०-५० सरकारी योजनांपैकी कोणत्याही योजनेत प्रवेश (ज्यासाठी ते आणि त्यांचे कुटुंब पात्र होते) मिळवून देण्यात मदत होत असे.

दिनेश म्हणतात की त्यांची संस्था करत असलेले काम इतर काही संस्था सुद्धा करतात. दिनेश सारखे कौशल्य आणि ज्ञान असलेल्या एखाद्यासाठी मर्यादित संधी (limited opportunities) आहेत. “माझी व्यावसायिक कारकीर्द सामाजिक क्षेत्रात आहे. मी १८ वर्षे काम केले आहे आणि समुदायांसोबत काम करणे, माहिती आणि डेटा संकलित करण्यात मदत करणे, मोठ्या संशोधन सर्वेक्षणांचे व्यवस्थापन करणे आणि प्रशिक्षण आणि सुविधा आयोजित करणे यासाठी लक्षणीय कौशल्ये तयार केली आहेत. पण जर इतर सामाजिक सेवा संस्थांनीही कामावर घेणे बंद केले, तर आम्ही कुठे जाऊ, कसे जगू?" ते विचारतात.

## खूप लोकं, खूप कमी नोकऱ्या

अनेक फ्रंटलाइन कार्यकर्त्यांसाठी, नवीन नोकरीसाठी अर्ज करणे आणि ती मिळवणे हे आव्हान आहे. दिनेश म्हणतात की ते नोकरी शोधात असतानाही ती मिळण्याची शक्यता कमी आहे हे त्यांना माहीत आहे. देशभरात आधीच बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये, त्यांच्या विशिष्ट कौशल्यामुळे त्यांचा अर्ज शॉर्टलिस्ट होत नाही. त्यांच्या कौशल्याचा फायदा घेऊ शकणाऱ्या इतर सामाजिक सेवा संस्था कामावर घेत नाहीत किंवा त्यांच्याकडे खूप जास्त अर्जदार आहेत.

शिवाय, अनेकांसाठी, अर्जाची प्रक्रिया स्वतःच कठीण असते. जून २०२३ मध्ये नोकरी गमावण्यापूर्वी मुकेश कुमार हे CARE चे जिल्हा शैक्षणिक सहकारी होते. जवळपास १२ वर्षांपूर्वी मोठ्या शैक्षणिक सामाजिक सेवा संस्थेमध्ये कमी पगाराच्या पदावरुन सुरुवात करून, ते जिल्हा-स्तरीय समन्वयक बनले आहेत.

मुकेश या क्षेत्रातील त्यांच्या नेटवर्कशी बोलत आहेत. कोणत्याही खुल्या पदांसाठी देवनेट (DevNet) आणि लिंक्डइन (LinkedIn) शोधत आहेत आणि त्यांच्या जिल्ह्यातील नोकऱ्या गुगल (Google) करत आहेत. संगणक (Computer) किंवा लॅपटॉप नसल्यामुळे समस्या वाढली आहे. "तंत्रज्ञान प्रगत झाले असले आणि आता सहज उपलब्ध झाले असले तरी, माझ्याकडे संगणक विकत घेण्याचे कोणतेही साधन नाही. याचा अर्थ असा की जेव्हा मला संस्था त्यांच्या भरती प्रक्रियेचा भाग म्हणून चाचणी असाइनमेंट (assignment) देतात, तेव्हा मला एकतर माझ्या मोबाईल फोनवर उत्तरे टाईप करावी लागतात (जे करणे अत्यंत कठीण आहे) किंवा ते हाताने लिहावे लागतात, कागदपत्र स्कॅन करावे लागतात आणि मग त्यांना ई-मेल करावे लागतात,” असे मुकेश यांचे म्हणने आहे.

दिनेश पुढे सांगतात की, त्यांना सामाजिक क्षेत्रात काम करत राहायला आवडले असते, पण त्यांना दुसऱ्या क्षेत्रांमध्ये नोकरी शोधण्याशिवाय पर्याय नाही. “सरकारी आणि खाजगी क्षेत्राच्या विपरीत, आमच्या सामाजिक सेवा संस्थेच्या पगारात बचत करणे कठीण आहे. मला सामाजिक क्षेत्रात काम करणे, समुदायाशी नातेसंबंध निर्माण करणे आणि लोकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यात मदत करणे यात आनंद मिळतो. मला या जागेत काम करत राहून समाजासाठी योगदान द्यायचे आहे, पण आता माझ्याकडे काहीच पर्याय नाही,” असे ते म्हणतात.

मुकेश यांनी समाजासोबत निर्माण केलेल्या खोल विश्वास आणि नातेसंबंधांचा पुनरुच्चार केला. “शाळांमध्ये काय चालले आहे याची माहिती पालकांना आम्ही देतो. आणि त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळते की नाही याची खात्री करण्यासाठी आम्ही कुटुंबांसोबत जवळून काम करतो. आम्हाला शिक्षण व्यवस्थेतील तफावत समजते, आणि म्हणून आम्ही सरकारी कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देतो, पालक-शिक्षक संवाद सुलभ करतो, पालकांना त्यांच्या मुलांशी कसे वागले पाहिजे हे समजून घेण्यात मदत करतो, इत्यादी. लोकं आमच्यावर विश्वास ठेवतात कारण त्यांना माहित आहे की आम्ही हे त्यांच्या फायद्यासाठी करत आहोत.”

## ते आता कुठे जाऊ शकतात?

मोठ्या कॉर्पोरेट फाऊंडेशन्स (corporate foundations) व्यतिरिक्त ज्या कंपन्या स्वतः कार्यक्रम राबवतात, त्यांच्याकडे मोठ्या टीम्स आहेत आणि त्यांना चांगल्या प्रकारे निधी दिला जातो. बहुतेक सामाजिक सेवा संस्था हतबल आहेत कारण अ) त्यांच्याकडे स्वतः संसाधनांची कमतरता आहे आणि त्यांच्याकडे अतिरिक्त निधी नाही व ब) त्यांना आपले FCRA परवाने रद्द होण्याची भीती आहे आणि आणि याचा त्यांच्या कार्यकर्त्यांवर आणि समुदायावर काय परिणाम होईल याची देखील भीती आहे,.

दिनेश पुढे असे सांगता आहेत की लोकं त्यांना व्यवसाय सुरू करण्याचा सल्ला देत आहेत. “पण व्यवसाय सुरू व्हायला पाच ते दहा वर्षे लागतात. मी आधीच ४० वर्षांचा आहे. व्यवसायात कुठेतरी पोहोचेपर्यंत माझे वय ५० असेल. आणि या दरम्यान माझी मुलं मोठी होत असतानाचा वाढता खर्च मी कसा सांभाळणार?"

## लोकं क्षेत्राबाहेर काम शोधतील अशी उच्च शक्यता आहे

मुकेश यांची परिस्थिती इतकी बिकट आहे की ते गेल्या दोन आठवड्यांपासून मेकॅनिक म्हणून काम करत आहेत. सीमा आणि दिनेश यांच्या प्रमाणेच, त्यांच्याकडे शिक्षण, प्रशिक्षण आणि फैसिलिटेशन , नातेसंबंध

निर्माण करणे आणि कम्युनिकेशन असे कौशल्ये आहेत, यापैकी बहुतेक कौशल्ये त्यांना सध्या निरुपयोगी वाटतात.

“माझे मित्र माझ्यावर हसतात,” ते म्हणतात. "पण माझ्याकडे काय पर्याय आहे? मी ३५ वर्षांचा आहे; मला पत्नी, तीन मुले आणि वृद्ध आई- वडिलांना सांभाळावे लागते. मला महिन्याला २१,५०० रुपये मिळायचे. माझ्याकडे आता काही महिन्यांपासून नोकरी नाही आणि जरी मी कुटुंबाचा एकमेव कमावता असलो तरी माझ्याकडे अजिबात पैसे नाहीत. भविष्य खूप अंधकारमय दिसत आहे.”

ग्रामीण समुदायांसोबत मोठ्या प्रमाणात काम करणाऱ्या आघाडीच्या समाज सेवक संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणतात की अनेक FCRA परवाने रद्द केले जात आहेत आणि याचा परिणाम म्हणून अनेक लोकांनी नोकऱ्या गमावल्या आहेत, लोकं क्षेत्राबाहेर काम शोधतील याची उच्च शक्यता आहे.

“मला भीती वाटते की कंपन्या या आघाडीच्या कामगारांच्या आर्थिक संकटाचा अवाजवी फायदा घेतील आणि त्यांना सोने आणि इतर कर्जासाठी रिकव्हरी एजंट (recovery agent) म्हणून नोकरी देऊ शकतील. त्यांनी समुदायांसोबत बांधलेल्या घनिष्ट नातेसंबंधांचा या वित्तीय कंपन्यांकडून पैसे वसूल करण्यासाठी गैरवापर होण्याची शक्यता आहे—हे आतापर्यंत या आघाडीच्या बहुतेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या समुदायांमध्ये केलेल्या सेवा-भावनेच्या कामाच्या अगदी उलट असेल” ते म्हणतात.

## देशाला मागे टाकत आहे

दिनेश सांगतात की त्यांनी ज्या संस्थेसाठी काम केले आहे, ती संस्था सर्व सामन्यांसाठी साठी आवाज उठवते. “आम्ही हे सुनिश्चित केले की ते त्यांचे हक्क मिळवू शकतील, मग ती शिष्यवृत्ती असो किंवा विधवा पेन्शन असो किंवा मुलाचे जन्म प्रमाणपत्र असो. आता त्यांच्या बाजूने कोण बोलणार, त्यांचा आवाज सत्तेपर्यंत कोण पोहोचवणार?" ते विचारतात. “आम्हाला बंद करून ते सर्वसामान्यांचा आवाज बंद करत आहेत,” असे त्यांचे म्हणणे आहे.

लोकांचा त्यांच्यावर विश्वास होता, असे मुकेश सांगतात. “त्यांना माहित होते की आम्ही त्यांच्यासाठी काम करत आहोत. त्यांना राज्याकडून त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी, शिक्षण आणि आरोग्य सेवेच्या बाबतीत त्यांच्या मुलांचे हित जपण्यासाठी आणि त्यांच्या आणि सरकारमधील पूल बनण्यासाठी ते आमच्यावर विश्वास ठेवू शकत होते.”

आधी उल्लेख केलेल्या सामजिक संस्थेच्या प्रमुखांच्या मते, जर तुम्ही ही लोकं गमावली जी समुदायांशी कनेक्टर आहेत, तर तुम्ही उपेक्षित (marginalized) लोकांची दृश्यमानता हिसकावून घेत आहात. “या

सामजिक संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते आपल्या देशात सहभागी लोकशाहीच्या कल्पनेला चालना देतात आणि सक्षम करतात – ते असुरक्षित/वंचित समुदायांना प्रशासनासोबत जोडत आहेत, त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्लॅटफॉर्म आणि माध्यम उपलब्ध करुन डेट आहेत, तसेच त्यांच्यासाठी सरकारी सेवा सक्षम करतात. त्यांच्याशिवाय, सक्रिय नागरिकत्व नाही आणि आपण त्या भूतकाळाकडे परत जाऊ जिथे या समुदायांना आपल्या लोकशाहीत कोणतीही शक्ती नव्हती. त्यामुळे, २०४७ मध्ये एका विकसित देशाची कल्पना करण्या ऐवजी, आपण आणखी २५ वर्षे मागे जाणार आहोत," ते म्हणतात.

**तळटीप/फूट नोट**

- 23 मार्च 2023 पर्यंतचा डेटा उपलब्ध आहे.
- नानफा (नॉनप्रॉफिट) संस्थेचा फ्रंटलाइन कार्यकर्ता प्रत्येकी चार लोकांचा समावेश असलेल्या सरासरी किमान 40-50 कुटुंबांशी जोडतो. सरासरी, सर्वात लहान ना-नफा (नॉनप्रॉफिट) कोणत्याही वेळी 15-20 कम्युनिटी मोबिलायझर्ससोबत काम करतात, STC सारख्या मोठ्या नानफा (नॉनप्रॉफिट) 600-800 फ्रंटलाइन कामगारांसह काम करू शकतात, तर CARE सारख्या खरोखर मोठ्या संस्थांमध्ये अंदाजे 4,000 फ्रंटलाइन कर्मचारी असतात .

**अधिक जाणून घ्या**

- गेल्या पाच वर्षांत सरकारने किती परवाने रद्द केले आहेत हे जाणून घेण्यासाठी हा लेख वाचा.
- हा लेख वाचा किंवा FCRA सुधारणा आणि त्यांचे परिणाम याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी हे Instagram Live पहा.
- FCRA परवाने रद्द करण्याबाबतच्या चौकशीला गृह मंत्रालयाच्या प्रतिसादाबद्दल जाणून घेण्यासाठी हा लेख वाचा.

*या लेखाचा अनुवाद आराधना सनील यांनी केला आहे, आणि रोहन चौहान यांनी संपादन केले आहे.*

**रजिका सेठ** आय.डी.आर. हिंदीच्या प्रमुख आहेत, त्या स्ट्रेटेजी, एडिटोरियल डायरेक्शन आणि डेव्हलपमेंट नेतृत्व करत आहेत. राजिका यांच्याकडे गवर्नेंस, यूथ डेव्हलपमेंट, एजुकेशन, सिटीजन-स्टेट इंगेजमेंट आणि जेंडर यासारख्या क्षेत्रात काम करण्याचा १५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी स्ट्रेटेजी ट्रेनिंग आणि फेसिलिटेशन, प्रोग्राम डिजाईन आणि रिसर्च या क्षेत्रात टीमचे व्यवस्थापन आणि नेतृत्व केले आहे. यापूर्वी, रजिका यांनी अकाऊंटिबिलिटी इनिशिएटिव्ह, सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च येथे कैपेसिटी बिल्डिंग कामाची सुरुवात आणि नेतृत्व केले आहे. रजिकाने टीच फॉर इंडिया, नेहरू मेमोरियल म्युझियम आणि लायब्ररी

आणि सी.आर.आय.ए. (CREA) सोबतही काम केले आहे. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून इंग्रजी साहित्यात बी.ए. आणि आय.डी.एस., ससेक्स विद्यापीठातून डेवलपमेंटल स्टडीज मध्ये एम.ए. देखिल केले आहे.

**स्मरिनीता शेट्टी** या आय.डी.आर. (IDR) च्या सह-संस्थापिका आणि CEO आहेत. याआधी स्मरिनीताने दसरा, मॉनिटर इनक्लुसिव्ह मार्केट्स (आता एफ.एस.जी), जे.पी. मॉर्गन आणि इकॉनॉमिक टाइम्समध्ये काम केले आहे. त्यांनी नेटस्क्राइब्सची स्थापना देखील केली आहे – जी भारतातील पहिली नॉलेज प्रोसेस आउटसोर्सिंग संस्था आहे. स्मरिनीताने मुंबई विद्यापीठातून कंप्यूटर इंजीनियरिंग मध्ये बी.ई. आणि फायनान्समध्ये एम.बी.ए. केले आहे.